**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५० | विषय क्रमांक- ३५०

दिनांक- ०७ /०१/२०२५ | विभाग - पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** जिल्हा न्यायालयीन इमारतींच्या पाणीपट्टी शास्ती कमी करणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार, जिल्हा न्यायाधीश - २ व अति सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांना नविन न्यायालयीना इमारत व शासकीय निवासस्थाना करिता असलेल्या नळ जोडणीचे दि.३१/०४/२०२४ पर्यतचे पाणी बीले अहमदनगर महानगरपालिका उपायुक्त कर तथा मुल्य निर्धारक व कर संकला अधिकारी यांचे कडील खालिल प्रमाणे पाणी पट्टी बिलामध्ये दंडात्मक रक्कम/शास्ती दर्शवून बिले सादर करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | तपशिल | बिल | दंडात्मक रक्कम/शास्ती | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | मा.जिल्हा न्यायाधीश ‑ ४ अती सत्र ‑ न्यायाधीश नविन इमारत | २४,३४०/- | ३,०१६/- | २७,३५६/- |
| २ | मा.जिल्हा न्यायाधीश ‑ ४ अती सत्र ‑ न्यायाधीश शासकीय निवासस्थान | ५,४९५/- | ७४१/- | ६,२३६/- |
| ३ | अहमदनगर जिल्हा न्यायाधीश अहमद-नगर बंगला क्र.०१ | ६,७२०/- | ९८७/- | ७,७०७/- |
| ४ | अहमदनगर जिल्हा न्यायाधीश अहमदनगर बंगला क्र.०२ | ३,५७०/- | ५६८/- | ४,१३८/- |
| ५ | अहमदनगर जिल्हा न्यायाधीश अहमदनगर बंगला क्र.०३ | ४,३४५/- | ६२४/- | ४,९६९/- |
| | **एकुण -** | **४४,४७०/-** | **५,९३६/-** | **५०,४०६/-** |

त्यामुळे कोषागार कार्यालयाकडून सदरची बिले स्विकारली जात नाही. त्यामुळे न्यायालयाचे बिलामध्ये दंडात्मक रक्कम अथवा शास्ती वगळून बिले सादर करणे आवश्यक आहे. या सोबत न्यायालयाकडून दंडात्मक रक्कम अथवा शास्ती वगळून बिलाची रक्कम देण्यात येत आहे. त्यामुळे सदरचे बिलामधील दंडात्मक रक्कम अथवा शास्तीची रक्कम वगळण्यात यावी. व येथूना पुढे पाणी बील सादर करताना दंडात्मक रक्कम व शास्तीची रक्कमेची आकारणी करू नये व येथून पुढे कायमस्वरूपी न्यायालयाचे पाणी बील सादर करताना कुठल्याही प्रकारची दंडात्मक रक्कम/व्याज/शास्ती/आकारण्यात येवू नये या बाबत इकडेस विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, अहिल्यानगर महानगरपालिके मार्फत जिल्हा न्यायालय अहिल्यानगर येथील मा.जिल्हा न्यायाधीश - २ व अति. सत्र न्यायाधीश, यांना वरिल ०१ ते ०५ नळ कनेक्शनव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. व म.न.पा कडून दरमहा पाणी बीले त्यांचे कार्यालयास देण्यात येत असून संबंधीतांन कडून पाणी बीलाच्या निव्वळ रकमेचा भरणा करण्यात येत आहे. तसेच संगणक प्रणाली अंतर्गत दरमहा बिल जनरेट केल्यावर देयक दिनांकाच्या आत नळ धारकाने बील भरणे अनिवार्य आहे. परंतू संबंधीतांनकडून निधी उपलब्धते नुसार भरणा केला जात असल्याने बीलाच्या देय दिनांका प्रमाणे भरणा होत नाही. त्यामुळे संगणक प्रणाली मध्ये सदर पाणी बीलाचा थकबाकीवर दरमहा व्याजाची आकारणी होत आहे. यास्तव मा.जिल्हा - न्यायाधीश - २ व अति. सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांनी त्यांचे अखत्यारितील वरिल नमूद ०१ ते ०५ नळ क-नेक्शन पाणी बीलाच्या थकबाकीवरील दंडात्मक रक्कम व्याज/विलंब आकार रक्कम रूपये ५,९३६/- क्षमापीत करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५१ विषय क्रमांक- ३५१

दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - सार्व.बांधकाम विभाग

---

**विषय :-** साहिल्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना "सन २०२३-२४ अंतर्गत "ई निविदा क्र.१११३६७२-५ छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बाबासाहेब आंबेडकर वसाहत पर्यत पथदिवे बसविणे व दुभाजक बसविणे बाबत.

**ठराव :-** उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- COLAHM ३००१२(१६)/४६/२०२४Municipal १/६२५०८९/२०२४ दि.०९/१०/२०२४

२.जाहिर निविदा क्र.ई निविदा क्रमांक :- १११३६७२-६ सन २०२४-२०२५

३.निविदा विक्री कालावधी :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४

४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४

५.निविदा उघडण्याची तारीख :- दि. २१/१०/२०२४

६.कामाची मुदत : ०६ महिने

७.प्राप्त झालेलया निविदेचा तपशील दि.१०/१२/२०२४ च्या तांत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला निविदा दर | सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ई निविदा क्रमांक १११३६७२-६ | ई निविदा क्र. १११३६७२-६ छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बाबासाहेब आंबेडकर वसाहत पर्यत पथदिवे बसविणे व दुभाजक बसविणे | **३१,६२,१३१/-** | **पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर अहिल्यानगर** | निविदा दराने | **पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर अहिल्यानगर** |
| | | | **मे.संचित इलेक्ट्रीकल्स अहिल्यानगर** | निविदा दरापेक्षा २% जादा दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद निविदा धारक पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर अहिल्यानगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे. निविदाधारक पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर अहिल्यानगर यांची निविदा निविदा दराने आलेली आहे.

तरी उक्त बाब विचारात घेउन निविदाधारक पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर अहिल्यानगर यांची निविदा दराच्या निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५२ विषय क्रमांक- ३५२

दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - मार्केट विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या छाया टॉकीज शॉंपिग सेंटर मधील गाळयांचे सुधारीत भाडे मुल्यांकन करून जादा वसुल रकमेचे समायोजन करणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार,मनपाच्या गाळयांचे दि. ०६/१२/२०१६ व दि. १४/०१/२०१९ च्या दरपत्रकामध्ये तफावत असल्याने या भाडेदर पत्रकाचे विशलेषन करून त्यात दुरूस्ती करून भाडे कमी करून मिळणे बाबत छाया टॉकीज शॉ.सेंटर मधील सर्व भाडेकरू (गाळेधारक)यांचा दि.२४-११-२०२३चा अर्ज तसेच पन्नालाल वेणीराम पालीवाल , सोमेश पालीवाल यांचे दि.०७-११-२०२३ रोजीचे अर्ज देवून सोबत दि.०६-१२-२०१६ व दि. १४-०१-२०१९ रोजीचे आपल्या विभागाकडील भाडे निश्चिती अहवाल सोबत जोडले आहे. सदरची बाब ही आपल्या विभागाशी निगडीत असल्याने संदर्भिय मुळ अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाही करिता मार्केट विभाग जा.क्र. ३७३ दि.०४-१२-२०२३ रोजी पाठविला असता नगररचना विभागाने जा.क्र.२८३ दि.०९-०५-२०२४ अन्वये विभागाने जा.क्र.न.र.२३१ दि.१४-०१-२०१९ चा मुल्यांकन अहवाल उक्त पत्रासोबत जोडून सादर केला आहे. सदर मुल्यांकन अहवालाचे अवलोकन केले असता सदर अहवालामध्ये दरमहा भाडे रू. मुल्यांकनामध्ये टाईपिंग करतांना चुक झ ालेली दिसून येत आहे. त्यामुळे छाया टॉकीज शॉ.सेंटर मधील गाळयाचे सुधारित भाडे मुल्यांकन सन २०१८-२०१९ च्या दरानुसार रू.३२०/-प्रती चौ.मी.दरमहा भाडे गाळेधारक यांस आकारणी करणे योग्य होईल असा अभिप्राय दिला आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या छाया टॉकीज शॉ.सेंटर मधील सर्व गाळेधारकांना नगररचना विभागाच्या अभिप्रायामुळे सन २०१८-२०१९ च्या टाचन रजिस्टरला दरमहा भाडे रू. मुल्यांकनामध्ये टाईपिंग करतांना चुक झालेली असल्याने म्हणजे रू.६३०/- या दराने सर्व गाळेधारकांना सन २०१८-२०१९ पासून चुकीची आकारणी झालेली आहे. ती आकारणी दुरूस्त करून रू.३२०/- प्रती चौ.मी. दरमहा भाडे या दराने सन २०१८-२०१९ पासून गाळेधारक यांस आकारणी करावी लागेल तसेच ज्या गाळेधारकांनी सन २०२३-२०२४ अखेर संपूर्ण गाळेभाडेचा भरणा केलेला आहे तसेच ज्या गाळेधारकांची जादा रक्कम वसुल आहे अशा गाळेधारकांची भाडे रक्कम परत न करता पुढील बिलात /आर्थिक वर्षात त्या रकमेचे समायोजन करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५३ विषय क्रमांक- ३५३
दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - आस्थापना विभाग

---

**विषय :-** इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरिता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरम यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५४ विषय क्रमांक- ३५४
दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - सार्व. बांधकाम विभाग

---

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२३-२०२४ अंतर्गत ई निविदा क्रमांक १११३६७२-४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १६ मध्ये सर्व्हे नं. ४२४ +२- +४२६ ओपन स्पेस मध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणे

**ठराव :-** उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.
१.प्रशासकिय मान्यता :- COLAHM ३००१२(१६)/४६/२०२४Municipal १/६२५०८९/२०२४ दि.०९/१०/२०२४
२.जाहिर निविदा क्र.ई निविदा क्रमांक :- १११३६७२-४ सन २०२४-२०२५
३.निविदा विक्री कालावधी :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४
४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४
५.निविदा उघडण्याची तारीख :- दि. २१/१०/२०२४
६.कामाची मुदत : ०६ महिने
७.प्राप्त झालेलया निविदेचा तपशील दि.१०/१२/२०२४ च्या तांत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला निविदा दर | सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ई निविदा क्रमांक १११३६७२-४ | ई निविदा क्रमांक १११३६७२-४ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १६ मध्ये सर्व्हे नं. ४२४ +२- +४२६ ओपन स्पेस मध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणे | ३५,६०,८६४/- | विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर | निविदा दराने | विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर व निविदा दराने |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव, केडगांव अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २% जादा दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद निविदा धारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे. निविदाधारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा निविदा दराने आलेली आहे.

तरी उक्त बाब विचारात घेउन निविदाधारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा दराच्या निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५५ — विषय क्रमांक- ३५५
दिनांक- ०७ /०१/२०२५ — विभाग - सार्व.बांधकाम विभाग

---

**विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२३-२०२४ अंतर्गत ई निविदा क्रमांक १११३६७२-७ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १४ मधील शक्तीनगर केदार वस्ती सोलापूर रोड रस्ते विकसीत करणे

**ठराव :-** उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.
१.प्रशासकिय मान्यता :- COLAHM ३००१२(१६)/४६/२०२४Municipal १/६२५०८९/२०२४ दि.०९/१०/२०२४
२.जाहिर निविदा क्र.ई निविदा क्रमांक :- १११३६७२-७ सन २०२४-२०२५
३.निविदा विक्री कालावधी :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४
४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४
५.निविदा उघडण्याची तारीख :- दि. २१/१०/२०२४
६.कामाची मुदत : ०६ महिने
७.प्राप्त झालेलया निविदेचा तपशील दि.१०/१२/२०२४ च्या तांत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदे मध्ये भरलेला निविदा दर | सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ई निविदा क्रमांक १११३६७२-७ | ई निविदा क्रमांक १११३६७२-७ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १४ मधील शक्तीनगर केदार वस्ती सोलापूर रोड रस्ते विकसीत करणे | २२,४०,३०७/- | विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर | निविदा दराने | विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर व निविदा दराने |
| | | | श्री.चेतन मारूती जाधव, केडगांव अहिल्यानगर | निविदा दरापेक्षा २% जादा दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मक दृष्टया रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद निविदा धारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे. निविदाधारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा निविदा दराने आलेली आहे.

तरी उक्त बाब विचारात घेउन निविदाधारक विराट कंन्स्ट्रक्शन अहिल्यानगर यांची निविदा दराच्या निविदेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५६ — विषय क्रमांक- ३५६
दिनांक- ०७ /०१/२०२५ — विभाग - प्रभाग समिती क्र. ४

---

**विषय :-** प्रभाग समिती क्र. ४ श्री अनिल भगवान डाके यांचे मिळकतीचे दोन बिलापैकी एक बील रद्द करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अनिल भगवान डाके राहणार शांतीनगर सारसनगर यांनी इकडेस अर्ज देवून कळविले की, त्यांचे एकाच मालमत्तेचे दोन ओपन प्लॉट ची बिले येत आहेत. परंतु मालमत्ता एकच आहे. मी ओपन प्लॉट बिल नं. Z४२८१०९६१३ या बिलाचा भरणा नियमीत करत आहे. मला बिल नं. Z४२८११००८८ हे ओपन प्लॉट चे अतिरिक्त बिल येत असून ते कायम स्वरूपी निर्लेखीत करावे या प्रमाणे अर्ज दिलेला आहे.

श्री डाके यांचे मालमत्तेची नोंद वॉर्ड नं. २८ मध्ये असून त्यांचे बिल नंबर अनुक्रमे १)Z४२८१०९६१३ जुना बिल नंबर २२५ २) Z४२८११००८८ जुना बिल नं. ६८५ या प्रमाणे दोन मालमत्तांची नोंद आहे. अर्जदाराचे अर्जानुसार सदरील जागेची समक्ष पाहणी केली असता अर्जदाराची एकच मिळकत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मनपाचे मालमत्ता रजिस्टरला पूर्वी नगर चुकीने दोन मिळकतींची नोंद झालेली आहे. सदर दोन्ही मिळकतीचे करयोग्य मुल्य २५३८ आहे. अर्जदाराने दोन्ही मिळकती पैकी बिल नं. Z४२८१०९६१३ वरील मालमत्ता कराचा संपूर्ण भरणा केलेला आहे.

प्रत्यक्ष पहाणी अहवालात एकच मिळकत असल्याने बिल नं. Z४२८१०९६१३ हे बिल तसेच ठेवून झालेल्या डबल नोंदीचे बिल नं. Z४२८११००८८ हे रद्द होणेस तसेच सदर बिलावरील सन २०२४-२०२५ अखेर मालमत्ता कर व इतर कराची एकूण थकबाकी रक्कम रू.६९,२६५/- ही वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र प्रांतिक म.न.पा. अधिनियम १५२ अन्वये निर्लेखीत करणेस मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यात येत आहे.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५७ | विषय क्रमांक- ३५७
दिनांक- ०७ /०१/२०२५ | विभाग- सार्व. बांधकाम विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये श्री महादेव डी.काकडे (सेवा निवृत्त अभियंता) यांची मानधनावर नियुक्ती करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार,सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अमृत भुयारी गटर योजना ,माझी वसुंधरा०.२ व ०.३चाहुराणा स.नं. ४६/१ येथील अदययावत दवाखाना उभारणे, सावेडी स्पोर्टस कॉम्प्लेक्स , काटवन खंडोबा रस्ता, ई- बस सेवा ,१५० कोटी नगरोत्थान २४ रस्ते, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना, नागरी दलितेतर सुधार योजना व नाटय संकुल इमारत बांधकाम, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत महत्वाचे प्रकल्प कार्यवाहीत आहेत, तसेच मनपा फंडातील विविध विकास कामे सुध्दा मोठया प्रमाणावर कार्यवाहीत आहे. याच बरोबर मनपा फंड ,मा.नगरसेवक स्वेच्छा निधी, विकासभार निधी, रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले-आउट )अति.चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम, मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम ,मा.खासदार स्थानिक विकास कार्यक्रम या निधीमधून शहरातील अनेक ठिकाणी विकास कामे सुचविली जातात व विकास कामे चालू असतात मनपा फंडातील व शासकीय योजना विहीत वेळेत पार पाडणे आवश्यक आहेत. सर्व कामे अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार होणे आवश्यक आहेत, अन्यथा कामाच्या गुणवत्तेवरसुध्दा त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या शहरात चालू असलेल्या सर्व विकास कामांची जबाबदारी वरील २ अभियंत्यावर असून वेळे अभावी ते सर्व कामांवर देखरेख करू शकत नाही तसेच विविध कामाचे प्रस्ताव वेळेत देणे शक्य होत नाहीत यासर्व बाबीचा शहरातील विकास कामांवर विपरीत परिणाम होत आहे. श्री.महादेव डी.काकडे, सेवानिवृत्त उप अभियंता अभियंता म्हणून तत्कालीन नगरपरिषद व मनपाचे प्रत्यक्ष कामकाजाचा प्रदिर्घ अनुभव आहे. त्यांनी प्रभारी शहर अभियंता, अमृत भुयारी गटर योजना, पाणी पुरवठा विभागकडे कामकाज केलेले आहे. त्यांना शहरातील सर्व भागाची सखोल माहिती असुन बांधकाम, पाणी पुरवठा या विभागाशी संबंधीत कामे केलेली आहेत. त्यांना कामकाज करण्यांचा प्रदिर्घ अनुभव आहे.

श्री.महादेव डी.काकडे, सेवानिवृत्त उप अभियंता यांची उप अभियंता यापदी सहा महिन्याकरीता रूपये ५०,०००/- दरमहा एकत्रीत महानगधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. नियुक्ती बाबतचे पुढील कार्यालयीन सोपस्कार सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ पुर्ण करावेत.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५८ विषय क्रमांक- ३५८
दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - प्रकल्प विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये श्री राजेंद्र गजानन मेहेत्रे (सेवा निवृत्त अभियंता) यांची मानधनावर नियुक्ती करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार,सेवानिवृत्त उप अभियंता श्री. राजेंद्र गजानन मेहेत्रे यांनी अर्ज देवून मा.शासन निर्णयानुसार सेवा निवृत्ती वेतनावर काम करण्यास संधी मिळणे बाबत संदर्भ क्र. १ अन्वये अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर मा.आयुक्त यांनी सादर करा असे नमुद केलेले आहे.

या अनुषंगाने सादर करण्यांत येते की, श्री राजेंद्र गजानन मेहेत्रे यांना अभियंता म्हणून तत्कालीन नगरपरिषद व मनपाचे प्रत्यक्ष कामकाजाचा प्रदिर्घ अनुभव आहे. त्यांनी बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग तसेच प्रकल्प विभागाकडे कामकाज केलेले आहे.

श्री राजेंद्र गजानन मेहेत्रे यांना शहरातील सर्व भागाची सखोल माहिती असून स्वेच्छा निवृत्ती वेळी प्रकल्प विभागाचे कामकाज पहात होते. त्यामुळे प्रकल्प विभागाकडील एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-१ व फेज-२ ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजना इत्यादी कामकाज करण्यांचा प्रदिर्घ अनुभव आहे. प्रकल्पांच्या प्रगतीमध्ये सुधारणा करून लवकरात लवकर पूर्ण करणे देखील शक्य होईल.

श्री. राजेंद्र गजानन मेहेत्रे,सेवानिवृत्त उप अभियंता यांची उप अभियंता यापदी सहा महिन्याकरीता रूपये ५०,०००/- दरमहा एकत्रीत महानगधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करण्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. नियुक्ती बाबतचे पुढील कार्यालयीन सोपस्कार प्रकल्प विभागाने तात्काळ पुर्ण करावेत.

---

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३५९ — विषय क्रमांक- ३५९

दिनांक- ०७ /०१/२०२५ — विभाग - अर्थ विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग सन २०२४-२०२५चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रका बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसारअहिल्यानगर महानगरपालिकेच्या सन २०२४-२०२५ चे मंजूर अंदाजपत्रकातील खर्चाचे अनुदान वाढ /घट करणे बाबत घनकचरा विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सन २०२४-२०२५ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २(२) (अ) (ब) (क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समिती सरकारी वर्षात कोणत्याही वेळी -

(अ) अर्थ संकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब) अर्थ संकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीषार्तून दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षा खालील दुय्यक शीर्षातून दुस-या गौण शीर्षा खालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजूरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयां पेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम, एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजूरी देता येईल अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतूदीनुसार "कोणत्याही अर्थ संकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थ संकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थ संकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत " अशी तरतूद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ) (ब) (क) नुसार सन २०२४-२०२५ चे पुर्नविनियोजिनाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी बांधकाम विभागाने दिलेल्या प्रस्तावात रू. २००००००/- चे पुर्नविनियोजन सादर केले. तरी सोबत जोडलेला रू. २००००००/- पुर्नविनियोजन होवू शकते

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३०(३ )पहा

अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

सन २०२४-२०२५ चे सादर केलेले पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान , गौण व तपशिलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२४-२०२५) | दि.०२ जानेवारी अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावित कमी करावयाची रक्कम) | (४-६) सुधारित तरतूद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | १) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी जमा होणा-या रकमेतून कामे | १५०००००० | १३४९९०८७३ | २०००००० | १४८०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | **एकूण रक्कम (तरतूद)** | | | **२००००००** | | |

| | हया शिर्षात | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान , गौण व तपशिल वार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान (सन २०२४-२०२५) | दि.०२ जानेवारी अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावित कमी करावयाची रक्कम) | (४-६) सुधारित तरतूद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | बांधकाम विभाग | १) रेखांकन अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक) | १००००००० | ९८६१०४१ | २०००००० | १२०००००० | घनकचरा विभागाचा प्रस्ताव |
| | | | | | | | |
| | | **एकूण रक्कम (तरतूद)** | | | **२००००००** | | |

सन २०२४-२०२५ चे पुनर्विनियोजन करणेस मा.प्रशासक यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अंतिम मंजूरी करिता मा.महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३६० विषय क्रमांक- ३६०

दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - अर्थ विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग सन २०२४-२०२५चे अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष व तरतूद करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेच्यासन २०२४-२०२५ चे मंजूर अंदाजपत्रकात खचार्चे अनुदानात वाढ /घट करणेबाबत घनकचरा विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०१ व २ नुसार कार्यवाही करणे बाबत मुख्यलेखापरिक्षक यांचा शेरा आहे.

सदर रिपोर्ट मध्ये बांधकाम विभागाने सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकात जमा व खर्च बाजूस ई बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान )करिता १२००.०० लाख तरतूद मा.स्थायी समितीच्या मंजूरीस अधिन राहून करणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे स्वाक्षरीने या विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

महानगरपालिकेचे सन २०२४-२०२५ चे मंजूर मुळ अंदाजपत्रक रू. १५६०९१.५७ (लाख) असून ई -बस सेवा या नविन लेखाशिर्षमुळे रू. १२००.०० लाख जमा व खर्च बाजूस वाढ होवून महानगरपालिकेचे एकूण अंदाजपत्रक रू.१५७२९१.५७ लाख होईल.

तरी सदर ई -बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान)हे लेखाशिर्ष व जमा -खर्च बाजूस १२००.०० लाख करणेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. ई -बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान)हे लेखाशिर्ष व जमा -खर्च बाजूस ७००.०० लाख करणेस मान्यता देण्यात आल्याने सदर बाब लक्षात घेता जमा व खर्चाचे नविन लेखाशिर्ष करणे बाबत खालील प्रमाणे

जमा बाजू

| अ.क्र. | लेखाशिर्ष | २०२४-२०२५ साठी करावयाची तरतूद (लाखात) |
|---|---|---|
| १ | ई -बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान) | ७००.०० |

खर्च बाजू

| अ.क्र. | लेखाशिर्ष | २०२४-२०२५ साठी करावयाची तरतूद (लाखात) |
|---|---|---|
| १ | ई -बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान) | ७००.०० |

सदर ई -बस सेवा (केंद्र व राज्य शासन अनुदान)हे लेखाशिर्ष व जमा -खर्च बाजूस ७००.०० लाख करणेस तसेच एकूण अंदाजपत्रक रूपये १५६७९१.५७ लाख यास मा.प्रशासक यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अंतिम मंजूरी करिता मा.महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३६१ विषय क्रमांक- ३६१
दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - नगररचना विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करणेकामी नियुक्त केलेल्या पथकाचे कामास मुदतवाढ मिळणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिका स्थावर मिळकतीच्या नोंदी अद्यावत करणेकामी नियुक्त केलेल्या पथकाचे कामाबाबत पथकातील कर्मचारी हे त्यांची मुदत जरी संपलेली असली तरी देखील ते नेमून दिलेले काम करत आहेत त्यांना तांत्रीक खंड दोन दिवसाचा देउन दिनांक-१७/०९/२०२४ पासून ते दिनांक-१६/०८/२०२५ अखेर ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतववाढ पुर्वीची मंजुर केलेली रक्कम रुपये ९,४४,१६९/- (अक्षरी रक्कम रू.नउ लाख चौव्वेचाळीस हजार एकशे एकोणसत्तर मात्र) खर्चास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३६२ विषय क्रमांक- ३६२
दिनांक- ०७ /०१/२०२५ विभाग - एन.यु.एल.एम.विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका दिव्यांग विभागा मार्फत ५ टक्के राखीव निधी हा दिव्यांग व्यक्तीसाठीचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ चे अनुषंगाने विविध योजना / कार्यक्रम राबविणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावि केल्यानुसार संदर्भ क्र.१) मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवि-२० मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २८ ऑक्टोबर २०१५
संदर्भ क्र.२) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ दिनांक २८/१२/२०१६
संदर्भ क्र.३)मा.स्थायी समिती सभा क्र.५ दिनांक २६/०९/२०१७ चा विषय क्र. ४७ मंजूर ठराव
संदर्भ क्र.४)नगर विकास विभाग शा.नि.दिव्यांग २०१८/प्र.क्र.५२/१८/नवि-२८ दि.१० मे २०१८
संदर्भ क्र.५)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/शासन निर्णय :-अपंग २०१३/प्र.क्र२०१/अ.क्र.दि.२०फेब्रुवारी २०१९
संदर्भ क्र.६) मा.प्रशासक ठराव क्र. ५ दिनांक १५/०७/२०२४ चा विषय क्र. ९५ चा मंजूर ठराव
संदर्भ क्र.७) प्रहार दिव्यांग क्रांती संस्था यांचे दिनांक ०६/०१/२०२५ रोजीचे विनंती पत्र

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग) व्यक्तीची राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कार्यालयात नोंद घेण्यात येते. सदर दिव्यांग व्यक्तींना मासिक उदरनिर्वाह अनुदान देणे बाबत मा.स्थायी समिती सभा ५ दि.२६/०९/२०१७ चा विषय क्र. ४७ अन्वये ठराव मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार नोंदणी करण्यात आलेल्या व संगणकीकृत अपंग प्रमाणपत्र असणा-या दिव्यांग व्यक्तींना त्याच्या अपंगत्वाचा टक्केवारीनुसार मासिक उदरनिर्वाह अनुदान देण्याचे निश्चत केलेलेआहे. तरी संदर्भ क्र.१ नुसार मा.शासन निर्णयातील मुद्दा क्र. १५ नुसार महानगरपालिकेने माहे ऑक्टोबर २०१७ पासून अपंग (दिव्यांग) व्यक्तींना मासिक उदरनिर्वाह अनुदान सुरू केले.

संदर्भ क्र. ७ नुसार प्रहार दिव्यांग दिव्यांग क्रांती संस्था यांचे दिनांक ०६/०१/२०२५ रोजीचे विनंती पत्रानुसार त्यांनी संदर्भ क्र. ५ नुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/शासन निर्णय :-अपंग २०१३/प्र.क्र.२०१ अ.क्र. दिनांक २० फेब्रुवारी २०१९ चे शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तीसाठीचे धोरणानुसार २०१८ ची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे.

संदर्भ क्र. ५ नुसार अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तीसाठीचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण २०१८ ची अंमलबजावणी व या धोरणाची अंमलबजावणी आवश्यकतेनुसार विषयानुरूप अहिल्यानगर महानगरपालिकेच्या दिव्यांगांच्या ५%राखीव निधीतून मा.शासनाचे निर्णयानुसार विविध योजना /कार्यक्रम तयार करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
## मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक - ३०**

मा.प्रशासक ठराव क्र. ३६३ — विषय क्रमांक- ३६३

दिनांक- ०७ /०१/२०२५ — विभाग - पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिने घरगुती वापर पाणी पट्‌टीचे दरात वाढ करणे बाबत

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्या नुसार अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता चालू वर्षी पाणीपट्टीसह इतर करांचे अपेक्षित वसुली होत नसल्याने महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याने प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. परिणामी शहर पाणी योजनेपोटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने शहर पाणी पुरवठा योजनेची वीज बीले वेळेत भरणेस वारंवार अडचणी निर्माण होत आहे. वीज बीले वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे. अशा परिस्थितीत घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

पाणी पुरवठा योजना स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून पाणीपट्टी दरवाढ आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकीय मा.महासभेसमोर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावापैकी घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायिक वापर, औदयोगिक वापर, इत्यादीचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६ पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे. परंतु उत्पन्न वाढीत फारसा फरक पडलेला नाही.

घरगुती वापर नळ कनेक्शन धारकांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने उत्पन्न वाढीच्या दृष्टिकोनातून सन २०१८-२०१९ पासून घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे करिता विषयांकित बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा.महासभे समोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे बाबतचा प्रस्ताव दरवर्षी मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

परंतु घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे प्रकरणी मागील ०६ वर्षापासून अदयाप ठोस निर्णय झालेला नाही.

मुळातच अहिल्यानगर महानगरपालिका अस्तित्वात आले नंतर सन २००३ ला तत्कालीन मा.प्रशासक यांनी दरवाढी बाबत निर्णय घेवून तत्कालीन परिस्थितीत घरगुती पाणी ग्राहकांची (अर्धा इंची नळ कनेक्शन करिता ) रू. ८०६/- मध्ये दरवाढ करून रू. १५००/- इतकी पाणीपट्टी लागू केलेली होती. व तेव्हापासून आजतागायत २१ वर्ष इतक्या प्रदिघ कालावधीनंतरही पाणी पट्टीचा तोच दर कायम आहे.

अहिल्यानगर जिल्हयामधील नगरपंचायत, नगरपरिषद व नगरपालिका यांचेकडे घरगुती वापराच्या पिण्याच्या पाण्याचे दर अहिल्यानगर महानगरपालिकेपेक्षा जास्त आहेत. त्यातुलनेत सद्यस्थितीत आपल्या महानगरपालिकेचे दर अत्यल्प आहे. २१ वर्षे इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतरही पाणीपट्टीचा तोच दर कायम असताना शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्था चालविणे करिता येणारा खर्च प्रामुख्याने वीज बील , दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची कामे, आस्थापना खर्च इ. खर्चाचे अवलोकन केले असता यामध्ये कित्येक पटीने वाढ झाल्याचे निदर्शनास येत आहे.

अहिल्यानगर महानगरपालिके कडील एकूण नळ कनेक्शन, त्यामधून मिळणारे उत्पन्न व घरगुती नळ कनेक्शनमध्ये प्रस्तावित दरवाढी नुसार मिळणारे एकूण उत्पन्नाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वापर | कनेक्शनची साईज ' " ' मध्ये | चालू दर | प्रभाग समिती क्र.१ | प्रभाग समिती क्र.२ | प्रभाग समिती क्र.३ | प्रभाग समिती क्र.४ | एकुण कनेक्शन | चालू दरानुसार पात्र उत्पन्न | प्रस्तावित दर | प्रस्तावित दराने होणारे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 4 |
| 1 | घरगुती कनेक्शन | १/२" | 1500 | 29756 | 10665 | 6226 | 16779 | 63426 | 95139000 | 3000 | 190278000 |
| | | ३/४" | 3000 | 31 | 480 | 79 | 321 | 911 | 2733000 | 6000 | 5466000 |
| | | १" | 6000 | 3 | 3 | 3 | 15 | 24 | 144000 | 10000 | 240000 |
| | | | | 29790 | 11148 | 6308 | 17115 | 64361 | 98016000 | | 195984000 |
| 2 | व्यापारी कनेक्शन | १/२" | 10000 | 139 | 184 | 33 | 879 | 1235 | 12350000 | नाही | 12350000 |
| | | ३/४" | 20000 | 10 | 30 | 15 | 80 | 135 | 2700000 | नाही | 2700000 |
| | | १" | 40000 | 1 | 0 | 3 | 16 | 20 | 800000 | नाही | 800000 |
| | | | | 150 | 214 | 51 | 975 | 1390 | 15850000 | | 15850000 |
| 3 | औद्योगिक कनेक्शन | १/२" | 20000 | 0 | 1 | 8 | 0 | 9 | 180000 | नाही | 180000 |
| | | ३/४" | 40000 | 0 | 0 | 4 | 0 | 4 | 160000 | नाही | 160000 |
| | | १" | 80000 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 80000 | नाही | 80000 |
| | | | | 0 | 1 | 13 | 0 | 14 | 420000 | | 420000 |
| 4 | हद्दी बाहेर | १/२" | 3000 | 293 | 0 | 0 | 0 | 293 | 879000 | 6000 | 1758000 |
| | | ३/४" | 6000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | १" | 12000 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | 293 | 0 | 0 | 0 | 293 | 879000 | | 1758000 |
| 5 | मिटरप्रमाणे नळ कनेक्शन | मुख्य जलवाहिनी घरगुती | 10 | | | | | 16 | 2500000 | 20 | 5000000 |
| | | शहर घरगुती वापर | 5 | | | | | 18 | 500000 | 10 | 100000 |
| | | मुख्य जलवाहिनी व्यावसायिक | 150 | | | | | 17 | 16200000 | नाही | 16200000 |
| | | शहर व्यापारी | 20 | | | | | 21 | 4000000 | नाही | 4000000 |
| | | शहर औद्योगिक | 30 | | | | | 6 | 1200000 | नाही | 1200000 |
| | | | | | | | | 78 | 24400000 | | 26500000 |
| | | | एकुण | 30233 | 11363 | 6372 | 18090 | 66136 | 139565000 | | 240512000 |

तसेच प्रस्तावित घरगुती पाणी पट्टी दरवाढीस ज्या नळ कनेक्शन धारकांचा विरोध राहील, अशा नळ कनेक्शन धारकांना मीटर वापर पध्दतीने प्रचलित दरा प्रमाणे पाणी वापर करणेस अनुमती देता येईल.
त्यासाठीचे सध्याचे व प्रस्तावित दर पुढीलप्रमाणे आहेत.

| **मीटरप्रमाणे पाणी वापर** | **सध्याचा दर** | **प्रस्तावित दर** |
|---|---|---|
| घरगुती | रू. ५/- प्रति १००० लीटर करिता | रू. १०/- प्रति १००० लीटर करिता |

सन २०२५-२०२६ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणेस मा.प्रशासक यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अंतिम मंजूरी करिता मा.महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका